# आता मातीची लाज वाटतेय?

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# आता मातीची लाज वाटतेय?

येसु एक मध्यम वर्गीय शेतकरी ३–४ एकर वडिलोपार्जित जमिनीचा मालक. गेली ३–४ पिढयांपासून त्याच्या कुटुंबात शेती हाच व्यवसाय व शेतीच्या उत्पन्नावरच सर्व गुजराण चालते. यावरच त्याने दोन्ही मुलींची लग्ने व्यवस्थित पणे पार पाडली. दोन्ही मुली सासरी सुखात गुण्या गोविंदात नांदतात. दिनेश त्याचा लहान मुलगा नुकताच १२वी पास होउन कॉलेज मध्ये पुढील शिक्षण घेत होता.

जुलै, ऑगस्ट शेतक–यांसाठी कामाचे दिवस. शेतात राबायचे दिवस. पिकांनी डोके वर काढले होते. त्या बरोबर गवत पण उगवले होते. दोन दिवस झाले पावसाने थोडीशी उघडीप दिल्याने निंदणी करणे जरूरीचे म्हणून येसू दिनेशला म्हणाला.

“दिना, आजच्या दिस माह्यासंग शेतावर चाल गडया गवत लई उगवलंय बघ. ते काढाया हवं. निंदणी कराया पायजे. चार बाया बापडया मजुरीने सांगितल्याती. आज दिसभरात काही उरकायच न्हाय अन् आभाळबी भरून आलया. कवाबी देवाचे पानी फुटन बघ. पावसाच्या आत निंदणी व्हाया पायजे. ”

दिनेशला आपल्या वडिलांचे म्हणणे आवडले नाही. त्याला शेतात काम करण्याचा कंटाळा व शेतकामाच्या लाजे खातर तो म्हणाला, “आबा मी आता कॉलेजात जातो शाळेत नाही. अभ्यास खूप वाढलाय शिवाय उद्या आमचा क्लास पण आहे. मला शेतावर येणे जमणार नाही.

दिनेशचे बोल ऐकून येसू नाराज झाला. त्याला समजावित म्हणाला,“ आरं बाबा, जाशीन कालीजात. तु शिकलास मोठा झालास तर मलाबी अभिमानच हाय की. पण फकस्त एकच दिसाचा परस्न हाय बघ! येळेत काम होउन जाईन. मंग तुला परत सांगनार पण न्हाय. ”

दिनेश आपल्या मनातील खरे खरे बोलून गेला " मला मातीत काम करायची लाज वाटते. कपडे खराब होतात शिवाय मित्र बैलोबा चिडवतात. "

" आरं पोरा तु लहान हुता तवा याच मातीत खेळू नग म्हनलं तरी खेळायचा. खेळतांना उचललं तर रडायचा बोमलायचास. मोठा झाला तवा याच मातीच्या गा–यानं रंगपंचमीबी खेळलीया त्वा. तवा तुला लई मजा यायची बघं. या काळया मातीनं पिकवलं कृपा केलीय म्हनुन तु मोठा झालास. तुझं आजपावतरचं सिक्साण समदं या मातीच्या जोरावरच झालयं. आन् पोरा आपुन रोज भाकर तुकडा खातोय ते काय आभाळातून पडतो काय रं ? ती भाकरं या मातीतच पिकतीयानं. तु जी चार बुकं लिहितोय वाचतोय त्यो कागुद बी याच मातीत जलमलेल्या झाडांपास्न झालायं बघं. या मातीचं लई उपकार हाय बघं आपल्यावर. तु मी आन् समदं जग कुठं उभ –हायलरं? या मातीवरच ना, का आभाळात अधांतरी ? पोरा तु इतकी गानी गुनगुनतोस एक गानं तुला ठाव हाय का ?

"माती सांगे कुंभाराला पायी मज तुडविशी
तुझाच आहे अंत वेडया माझ्या पायाशी "

पोरा तु, मी समदे या मातीतच जलमलो आन् मेल्यावर बी या मातीतच जायचं हाय. ही काळी आई हाय.

या जगात हिच्या परिस कोनी बी मोठ न्हायं. हीची महती लय मोठी हाय संपता संपनार न्हाय. अन् या काळया आईची सेवा कराया तुला लाज वाटतीया व्हय रं? तु तिची सेवा केली तर ती तुला भरभरून आशीर्वाद दिन. तुला लय मोठ्ठ करन बघं. तीची सेवा कवाबी वाया जायाची न्हाय. तवा अभिमान सोड आन् माह्यासंग शेतावर चाल.

बापाच्या या शिकवणीने दिनेशचे डोळे उघडले. त्याच्या डोळयावरची धुंदी उतरली. बापाचे म्हणणे व वेळेचे महत्व दिनेशला मनोमन पटले. जर उद्या निंदणी झाली नाही व पाउस सुरू झाला तर शेतामध्ये अजून गवत माजेल व पिकाचे नुकसान होईल. तो म्हणाला, " आबा मी सकाळी लवकर उठेन थोडासा अभ्यास करून शेतावर जाईन व संध्याकाळी क्लासला जाईन."

"शाब्बास रं माझ्या पोरा." येसूच्या तोंडून गौरवोदगार निघाले.

दिनेशला धन्य वाटले. तो सकाळी लवकर उठला व बापाबरोबर शेतावर गेला. काम करता करता निंदणी करणा-या बायकां समवेत गाणी गात शेतीच्या कामाचा मनसोक्त आनंद लुटला. दुपारी ४ वाजेपर्यंत काम करून शेती व अभ्यास यांचा समन्वय साधत संध्याकाळी ६ वाजता क्लासला गेला.